Cambridge Assessment International Education

# Cambridge O Level

**MARATHI** **3218/02**

Paper 2 Translation and Reading Comprehension **October/November 2025**

**1 hour 30 minutes**

*5526641695*

You must answer on the answer booklet/paper.

You will need: Answer booklet/paper

**INSTRUCTIONS**
- Answer **all** questions.
- If you have been given an answer booklet, follow the instructions on the front cover of the answer booklet.
- Use a black or dark blue pen.
- Write your name, centre number and candidate number on all the work you hand in.
- Do **not** use an erasable pen or correction fluid.
- At the end of the examination, fasten all your work together. Do **not** use staples, paper clips or glue.

**INFORMATION**
- The total mark for this paper is 55.
- The number of marks for each question or part question is shown in brackets [ ].

This document has **4** pages.


© UCLES 2025

## Section A – Translation

**1** Translate into **English**.

मातृभाषा ही आपल्या संस्कृतीशी जुळलेली असते म्हणून त्याला खूप महत्व आहे. आपली मातृभाषा हे आपलं खरं ओळखपत्र आहे. आपल्याला त्याचा अभिमान असला पाहिजे. अनेक देशात मातृभाषेतूनच शिक्षण घेतात. विद्यार्थी मातृभाषेत शिकतात तेव्हा त्यांना आकलन लवकर होते असे संशोधकांनी सिद्ध केलं आहे. परंतु आता नोकरी मिळविण्याच्या दृष्टीने अनेक जण इंग्रजीतूनच शिकतात.
ज्ञानेश्वरी हा मराठी भाषेतील पहिला ग्रंथ 745 वर्षांपूर्वीचा आहे. म्हणूनच मराठी ही एक प्राचीन भाषा म्हणून ओळखली जाते. मराठी भाषा साहित्यात अतिशय संपन्न आहे. [10]

**2** Translate into **Marathi**.

Friendship is a beautiful and strong bond with people, though every bond evolves. Genuine friendship knows no caste or creed. It is based on honesty, trust and love. Good friends are always with you to share your joy and sorrow. They help you and guide you to fulfil your dreams. They may not be in touch with you in their busy schedules but the friend in need is always the friend indeed. You should give attention to them and should make a special effort to make your friend feel cared for and loved. Making and maintaining friendship is an essential skill. A person is judged by the friends he or she keeps. [20]

bond – बंध
caste or creed – जात-पात

© UCLES 2025

## Section B – Reading Comprehension

Do **not** translate the passage below. First read it carefully and then answer, briefly and in **Marathi**, the questions that follow.

नृत्य हे आनंद व्यक्त करण्याचे नैसर्गिक साधन आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सारे जण नेहमीच या कलेचा आनंद घेतात. आज शाळा-कॉलेजातील कार्यक्रम, वाढदिवस, लग्न अशा कोणत्याही छोट्या-मोठ्या सामाजिक समारंभात नृत्याला प्राधान्य दिले जाते.

नृत्य ही कला गायन-वादनाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. दिवसभराच्या श्रमानंतर, संध्याकाळी एकत्र येऊन, नृत्य-गायनाने विरंगुळा आणि मनोरंजन करणे, यातूनच लोकनृत्याचा जन्म झाला. कालांतराने या नृत्याला पुढे काही नियम लागू झाले. आणि नृत्य-शैलीला शास्त्रीय नृत्य-शैली म्हणून मान्यता मिळाली. काही कलावंत नृत्य हा छंद, केवळ एक आवड म्हणून न जोपासता व्यावसायिक क्षेत्र म्हणूनही निवडतात. हजारो वर्षापासूनच्या, देव-देवतांचे तसेच पौराणिक कथांतील स्त्री पुरुषांच्या भावनांचे कलात्मक सादरीकरण ही नृत्य-शक्ती आहे.

प्रत्येक ठिकाणच्या संस्कृती आणि लोककला यांच्या संयोगाने शास्त्रीय नृत्य-परंपरेचे वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले.

बॅले हे आकर्षक पाश्चिमात्य नाट्यनृत्य खास बूट वापरून, पायाच्या बोटांच्या टोकावर सादर करतात. आदिवासी नृत्य हे पारंपारिक ड्रमच्या तालावर सादर केले आफ्रिकन नृत्य आहे. आनंदाच्या किंवा दुःखाच्या समारंभांचा सुद्धा हा महत्त्वाचा भाग आहे. त्याची, समाजाला एकत्र आणण्यासाठी आणि उन्नत करण्यासाठी मदत होते. अर्जेंटिनाचे, जोडप्यांसाठी टँगो नृत्य लोकप्रिय आहे. कॅन-कॅन हा फ्रेंच नृत्य प्रकार आहे. मुलींच्या ओळी, त्यांचे रंगीत लांब स्कर्ट फिरवून, हे उत्साही नृत्य सादर करतात. फ्लॅमेंकोची मुळे स्पेनमध्ये आहेत. बुटांच्या तालावर, गिटारच्या संगीताबरोबर, ड्रम जुळण्यासाठी नर्तक त्यांच्या बोटांनी टिचक्या वाजवतात. भारतात कथक, मणिपुरी, भरतनाट्यम् आणि कथकली या प्रमुख शास्त्रीय नृत्य-पद्धती आहेत. शिवाय भांगडा, गरबा, लावणी, कोळीनृत्ये अशी अनेक लोकप्रिय लोकनृत्य आहेत.

नृत्य ही कला शिकून शरिरात मुरायलाच चार-पाच वर्षांचा कालावधी लागतो. म्हणूनच शास्त्रीय नृत्य आपल्याला चिकाटी, शिस्त आणि संयम शिकवते. तालावर नाच करताना गतिमान जीवनातील ताणतणावांचा विसर पडून निखळ आनंद आणि शारीरिक व्यायामही मिळतो. काहीजण बारीक व्हायला नृत्य शिकतात. नृत्य हा मानव संस्कृतीच्या सामाजिक जीवनाचा एक आवश्यक भाग आहे.

Now answer the following questions briefly, using your own words as far as possible.

3 नृत्य हा सामाजिक जीवनाचा एक आवश्यक भाग का आहे? [2]

4 लोकनृत्याची सुरुवात कशी झाली? [3]

5 नृत्य-शैलीला शास्त्रीय नृत्य-शैली म्हणून मान्यता कशी मिळाली? [2]

6 आदिवासी नृत्याचे वैशिष्ठ कोणते? [4]

7 फ्लॅमेंकोमध्ये कोणत्या चार वाद्यांचा समावेश असतो? [4]

8 नृत्य शिकण्याचे फायदे कोणते? [4]

9 उताऱ्यातील खालील शब्दांपैकी कोणत्याही **तीन** शब्दांचे अर्थ लिहा. [6]

**(i)** समारंभा

**(ii)** प्राधान्य

**(iii)** श्रमानंतर

**(iv)** कथां

**(v)** संयोगाने

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

To avoid the issue of disclosure of answer-related information to candidates, all copyright acknowledgements are reproduced online in the Cambridge Assessment International Education Copyright Acknowledgements Booklet. This is produced for each series of examinations and is freely available to download at www.cambridgeinternational.org after the live examination series.

Cambridge Assessment International Education is part of Cambridge Assessment. Cambridge Assessment is the brand name of the University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is a department of the University of Cambridge.